# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# सरदार वल्लभभाई पटेल यांनी देश एकसंघ ठेवला-चंद्रशेखर देशपांडे

## बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये जयंतीनिमित्त कार्यक्रम

वार्ताहर
पाटण

स्वतंत्र भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी भारताला एकसंघ ठेवण्याचे काम केले. सरदार पटेल यांनी शिकवलेली एकता ही एक वेळची गोष्ट नसून प्रत्येक पिढीने सतत जपायची आणि पुनरुज्जीवित करण्याची जबाबदारी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संस्थानांच्या बिलीनीकरणाची प्रक्रिया कणखरपणे पूर्ण करणारे लोहपुरुष सरदार पटेल भारताच्या एकतेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. म्हणून ३१ ऑक्टोबर हा दिवस दरवर्षी राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जात असल्याचे प्रतिपादन कराड येथील शिक्षण मंडळाचे सचिव तसेच जनकल्याण पतसंस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर देशपांडे यांनी केले.

पाटण येथील कोयना एज्युकेशन सोसायटीचे बाळासाहेब देसाई कॉलेज येथे आयक्यूएसी, एनएसएस, एनसीसी व सामाजिक शास्त्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर होते. यावेळी प्रा. डॉ. आर. जी. कांबळे, शिक्षण मंडळाचे सहसचिव राजेंद्र लाटकर, मंगेश चिवटे, संजीव चव्हाण, संचालक कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांची उपस्थिती होती.

अमरसिंह पाटणकर म्हणाले, संस्थानांचे भारतात विलीनीकरण करून भारत एकसंध राष्ट्र बनवण्याचे महान कार्य सरदार वल्लभभाई पटेल यांनी केले. आजही भारतात, विविधता वाढत असलेल्या आणि नव्या पिढीच्या आकांक्षा-विचारधारा बदलत असलेल्या काळातसुद्धा, पटेल यांचा तोच विश्वास भारताचा आधारस्तंभ म्हणून टिकून आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जीवनात सामाजिक बांधिलकी जोपासावी आणि सरदार पटेल यांच्या आदर्श विचारांनी वाटचाल करावी.

संजीव चव्हाण व प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. व्ही. एस. माथणे यांनी प्रास्ताविक, प्रा. डॉ. सौ. आर. पी. थरवल यांनी सूत्रसंचालन, प्रा. डॉ. एल. जी. गणगे यांनी आभार मानले. यावेळी ज्युनिअर विभागाचे प्रा. एस. ए. गायकवाड, प्रा. व्ही. एस. माथने, प्रा. डॉ. सौ. एच. व्ही. काटे, प्रा. तुषार महाले उपस्थित होते.